मंदिरातील मांजर

एंड्र्यू क्लेमेंट्स

चित्र: केट कीस्लर, मराठी: अश्विनी बर्वे



मंदिरातील मांजर

एंड्र्यू क्लेमेंट्स

चित्र: केट कीस्लर



नेबाच्या प्राचीन शहरात एक मंदिर होते आणि त्यात एक मांजर राहत होती. ती केवळ तिथे राहत नव्हती तर ती त्या देवळातली देवी होती.

जेव्हा ती छोट्या मांजराचे पिल्लू होते तेव्हा तिच्याकडे तिचे नोकर होते. जे तिची दिवसरात्र काळजी घेत असत, त्याशिवाय त्यांचे दुसरे कोणतेच काम नव्हते.

ते तिला खायला घालत.ते तिच्यासाठी गाणी गात,नृत्य करत. ते तिच्यासाठी पवित्र होम पेटवत असत.



ते तिला देवीसारखे पुजत असत. कोणालाच माहीत नाही की त्या देशातल्या लोकांनी मांजराची पूजा करायला कधी सुरुवात केली होती. मांजराला सुद्धा नक्की हे माहीत नव्हते आणि तिला त्याची पर्वा सुद्धा नव्हती. तिला एवढेच माहीत होते की त्या मंदिरातला देव होणे फारसे मजेदार नाही, सोप्पे नाही.

जेव्हा ती चमकणाऱ्या पाण्याच्या तलावात मासे पकडण्याचा प्रयत्न करे तेव्हा एखादा नोकर पळत जाऊन तिच्यासाठी मासे पकडून अंत असे. आणि मग माशाला मसाले लावून शिजवत असे. नंतर तो मासा एका सोनेरी भांड्यात घालून त्या मांजराला वाढत असे.



जेव्हा ती उन्हात खिडकीच्या गार
फरशीवर झोपत असे तेव्हा एक
नोकर तिला हळूच उचलत असे
आणि तिला तिच्या मऊ मुलायम
लाल उशीवर झोपवत असे.

जेव्हा तिला रात्रीच्या वेळी एकटे फिरावे वाटे आणि चांदण्यात उडणाऱ्या पतंगांना पकडावे वाटे आणि स्वतःच्या सावलीला घाबरावे वाटे. तेव्हाच एखादा नोकर तिच्यामागे पंखा आणि मशाल घेऊन येई आणि तिची सगळी मजा खराब करत असे.



अंगणात सगळ्यात वर, जिथे उंच नोकराचा हात सुद्धा पोहचणार नाही,बदामाच्या झाडाच्या सर्वात उंच फांदीवरून तिला मंदिराच्या भिंतीच्या पलीकडचे, खूप दूरवरचे तिला दिसत असे. तिथे रस्त्यावर मुलं खेळत होती. आणि तिथं जगातल्या सर्व मांजरी मुक्तपणे फिरत होत्या.



एका रात्री खूप उशिरा ती मंदिरातून
हळूच बाहेर सटकली.

आधी अंगणातून,मग एका गल्लीतून, गोठ्याच्या वरून, एक शेत पार करून, एक पहाड ओलांडून आणि एका कुरणातून चालत ती एका रस्त्याच्या किनाऱ्यावर आली. मग एका गावातून जात शेवटी ती सूर्य उगवण्याच्या वेळी ती एका गोठ्यात आराम करायला थांबली. आणि तिथे तिने मस्त झोपत काढली. अशी झोप तिला याआधी कधीच लागली नव्हती.

आणि अशा तऱ्हेने तिने अजून रात्री प्रवास केला. मग ती समुद्र किनाऱ्यावर आली. तिथे थंडी होती आणि मग ती एका छोट्या झोपडीकडे गेली. जिथे शेकोटी पेटवलेली होती. ती सावधपणे उजेडात गेली आणि म्याव करू लागली. प्रवास केल्याने आणि काहीही न खाल्ल्याने ती अशक्त झाली होती आणि थोडी जंगली दिसत होती. कोणीही अगदी मंदिराचे नोकर सुद्धा आता तिला ओळखू शकले नसते, की हीच देवी होती म्हणून.



तिथे एका हलणाऱ्या स्टुलावर बसणाऱ्या माणसाने तिच्याकडे माशाच्या डोक्याचा तुकडा फेकला. आपल्या आयुष्यात पहिल्यांदा त्या मांजराने खऱ्या मांजरासारखे खाल्ले. इतके रुचकर जेवण मांजराने याआधी कधीच चाखले नव्हते.

आणि नंतर जेव्हा मांजराने त्या कोळ्याच्या पायाला स्पर्श केला तेव्हा त्याने तिच्या कानाच्या मागे खाजवले.मांजराला याआधी एवढी मजा कशाने आली नव्हती.

दुसऱ्या दिवशी सकाळी गप्पा मारत कोळ्यांची
मुले चमकणाऱ्या उन्हात नाचत बाहेर आले.
आणि मग ते तिथेच थांबले.

आणि मग मांजराला माहीत होण्याच्या आधी तिची सर्वात प्रेमळ इच्छा काय होती, ती पूर्ण झाली होती. ती मुलांबरोबर खेळली आणि मुलांनी तिच्यावर खूप प्रेम केले.